महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे | Rs.2/-

बुधवार ❖०४ डिसेंबर २०२४ ❖वर्ष ६ ❖अंक १५९ ❖ पाने - ४

RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मध्ये कंपनी, मिळकत, जमीन- जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट, पोटगी, नावात बदल आदी कायदेविषयक छोट्या जाहिरातीना केवळ ५००/- रुपयांत प्रसिद्धी दिली जाईल; कोणत्याही शासकीय नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.

:: कार्यालय ::

९६१९१८८५५८ / ९१५८०७८६०१

E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com
news.thanejeevandeep@gmail.com

# फडणवीसांच्या शपथविधी सोहळ्याला केंद्रीय मंत्र्यांसह साधू-संतांना निमंत्रण

**महायुती सरकारचा शपथविधी सोहळा पाच डिसेंबरला मुंबईच्या आझाद मैदानावर पार पडणार आहे. या सोहळ्याची सध्या जोरदार तयारी केली जात आहे. देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री होणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे. शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासह १९ राज्याच्या मुख्यमंत्र्यांनाही शपथविधी सोहळ्याचे निमंत्रण देण्यात आले आहे.**



दै.ठाणे जीवनदिप वार्ता
मुंबई(प्रतिनिधी) :

ता.४: महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. आता महायुतीच्या सत्ता स्थापनेच्या हालचालींना वेग आला आहे.

महायुती सरकारचा शपथविधी सोहळा पाच डिसेंबरला मुंबईच्या आझाद मैदानावर पार पडणार आहे. या सोहळ्याची सध्या जोरदार तयारी केली जात आहे. देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री होणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे. शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासह १९ राज्याच्या मुख्यमंत्र्यांनाही शपथविधी सोहळ्याचे निमंत्रण देण्यात आले आहे. महायुतीच्या शपथविधी सोहळ्या ला माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, पृथ्वीराज चव्हाण, अशोक चव्हाण, सुशिलकुमार शिंदे यांना देखील निमंत्रीत केले जाणार आहे. तसेच १९ राज्यांचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री देखील उपस्थित राहणार आहेत. तर केंद्र सरकारमधील पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, रामदास आठवले यांच्यासह महत्वाचे केंद्रातील पाच मंत्री देखील या सोहळयाला हजेरी लावणार आहेत. 'या' नेत्यांना शपथविधीचे आमंत्रण योगी आदित्यनाथ - मुख्यमंत्री, उत्तर प्रदेश चंद्राबाबू नायडू - मुख्यमंत्री, आंध्रप्रदेश नितीन कुमार - मुख्यमंत्री, बिहार प्रेमा खांडू - मुख्यमंत्री, अरुणाचल प्रदेश हिमंत बिश्व शर्मा
- मुख्यमंत्री, आसाम विष्णूदेव साय
- मुख्यमंत्री, छत्तीसगढ प्रमोद सावंत
- मुख्यमंत्री, गोवा भूपेंद्र पटेल - मुख्यमंत्री, गुजरात नायब सिंह सैनी
- मुख्यमंत्री, हरियाणा मोहन यादव - मुख्यमंत्री, मध्य प्रदेश कॉनराड संगमा
- मुख्यमंत्री, मेघालय भजनलाल शर्मा
- मुख्यमंत्री, राजस्थान मानिक साहा
- मुख्यमंत्री, त्रिपुरा पुष्कर सिंह धामी
- मुख्यमंत्री, उत्तराखंड देशातील संत महंतांनाही निमंत्रण नरेंद्र महाराज नानीद नामदेव शास्त्री, भगवानगड राधानाथ स्वामी महाराज, इस्कॉन गौरांगदास महाराज, इस्कॉन जनार्दन हरीजी महाराज प्रसाद महाराज अंमळनेरकर महानुभाव संप्रदायाचे विध्वंस बाबा आणि मोहन महाराज जैन मुनी लोकेश महायुतीच्या शपथविधीत 'एक है तो सेफ है'चा नारा दिसणार दरम्यान, विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान भाजपने 'एक है तो सेफ है'चा नारा दिला होता. आता महायुतीच्या शपथविधीतही एक है तो सेफ है'चा नारा दिसणार आहे. महायुतीच्या शपथविधी सोहळयात दहा हजार भाजप कार्यकर्ते एक है तो सेफ है, अशा आशयाचे मजकूर असलेले टी शर्ट परिधान करणार आहेत. त्यामुळे महायुतीला विजय मिळवून दिलेल्या नाऱ्याची भाजपकडून पुनरावृत्ती केली जाणार आहे. तसेच शपथविधी काळात मराठी संगीतासह विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचेदेखील आयोजन करण्यात आले आहे.


# 'शिवसेनेइतक्या जागा आम्हालाही मिळाव्यात'

## - छगन भुजबळ




दै.ठाणे जीवनदिप वार्ता
मुंबई(प्रतिनिधी) :

ता.४: विधानसभा निवडणुकीच्या निकालात निर्विवाद बहुमत मिळवल्यानंतर आठवडा उलटला तरी महायुतीला मुख्यमंत्र्यांची निवड करून नवे सरकार स्थापन करता आलेले या निवडणुकीत १३२ जागा जिंकत बहुमताजवळ मजल मारल्याने भाजपाने मुख्यमंत्रिपदावर दावा केला आहे. त्यामुळे मागची अडीच वर्षे मुख्यमंत्रीपद सांभाळणाऱ्या एकनाथ शिंदे यांची निराशा झाली आहे. मुख्यमंत्रीपद नसेल तर सरकारमध्ये सन्मानजनक वाटा मिळावा, गृहमंत्रीपद शिंदे गटाकडे द्यावे, अशा मागण्या करत एकनाथ शिंदे यांनी ताठर भूमिका घेतली आहे. त्यामुळे सत्तास्थापनेच्या मार्गात तिढा निर्माण झाल्याचे चित्र आहे. एकीकडे एकनाथ शिंदे आजारी असून, दुसरीकडे अजित पवार मात्र दिल्लीत तळ ठोकून असल्याचे पाहायला मिळत आहे. एकीकडे एकनाथ शिंदे आजारी असल्यामुळे महायुतीच्या बैठका थांबल्या आहेत. मुख्यमंत्री कोण होणार? किती आमदार मंत्री म्हणून शपथबद्ध होणार? खाते वाटपाचा फॉर्म्युला काय असणार आणि कोणत्या पक्षांकडे कोणती खाती जाणार? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे महायुतीची बैठक होणार नसल्याने अनुत्तरित राहत आहेत. तर दुसरीकडे, भाजपासह महायुतीचे नेते आझाद मैदानावर जाऊन ५ डिसेंबर रोजी होणाऱ्या शपथविधीच्या भव्य सोहळ्याच्या तयारीचा आढावा घेत आहेत. तर अजित पवार दिल्लीत आहेत. महायुतीचा सत्तास्थापनेचा तिढा सुटत नसल्यामुळे राजकीय वर्तुळात उधाण आले



असतानाच छगन भुजबळ यांच्या मागणीमुळे आणि नव्या दाव्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्याचे सांगितले जात आहे. महायुतीत भाजपाच मोठा भाऊ, अजितदादा दोन क्रमांकावर स्ट्राईक रेटनुसार भाजपा एक नंबरवर आहे. तर आम्ही दोन नंबरवर आहोत आणि शिंदेंची पान ४ वर ▶▶

# लाडक्या बहिण योजनेसाठी नव्या अटी शर्थी



दै.ठाणे जीवनदिप वार्ता
मुंबई(प्रतिनिधी) :

विधानसभा निवडणुकीत महायुतीला दणदणीत विजय मिळविण्यात अन्य घटकांसोबतच मोठा वाटा असलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचाही मोठा वाटा आहे. मात्र, या योजनेच्या अटी व शर्तीमध्ये धक्कादायक बदल करण्याच्या चर्चा झडत आहेत.

त्यामुळे लाडक्या बहिणींनी धसका घेतल्याची कुजबुज जिल्हाभरात सुरू झाली आहे. यासंदर्भात जिल्हा महिला व बालविकास अधिकारी दीपक बानाईत यांच्याशी संपर्क साधला असता तो होऊ शकला नाही.

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महायुती सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना लॉन्च केली.

परिणामी, चंद्रपूर जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघांतही ही बहुचर्चित योजना गेमचेंजर ठरणार, असा दावा सत्ताधारी पक्षाचे समर्थक करीत होते. ही योजना अमलात आणण्यासाठी सरकारच्या निर्देशानुसार, प्रशासनानेही मोठी तत्परता दाखविली.

जिल्ह्यात ४ लाख ८५ हजार महिलांनी या योजनेचा लाभ घेतला. विधानसभा निवडणुकीत ही योजना महत्त्वपूर्ण ठरली. आता या लाडक्या बहिणींना पुढील हप्त्याची प्रतीक्षा लागली आहे.

**जानेवारी, जुलै की भाऊबीज ?**

आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी नुकतीच एका वृत्तवाहिनीला मुलाखत दिली. या मुलाखतीप्रसंगी त्यांनी लाडकी बहीण योजनेबाबत भूमिका मांडल्याने महिलांमध्ये चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. त्यात आमदार मुनगंटीवार म्हणाले, 'आम्ही १०० टक्के ते आश्वासन पूर्ण करू, महिलांना दिली जाणारी रक्कम १५०० रुपयांवरून २१०० रुपये अशी वाढवली नाही तर आमची प्रतिमा खराब होईल. पान ४ वर ▶▶

# ग्रामपंचायत निवडणुकांचा उडणार धुरळा ?



दै.ठाणे जीवनदिप वार्ता
अलिबाग(प्रतिनिधी) :

ता.४: मुदत संपलेल्या तब्बल २४० ग्रामपंचायतींच्या निवडणुकांची तयारी तहसीलस्तरावर सुरू झाली आहे. मतदार यादी तयार करून निवडणुकीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सामान्य प्रशासन विभागाला दोनच दिवसांपूर्वी देण्यात आल्या आहेत.त्यामुळे जिल्ह्यात आता ग्रामपंचायत निवडणुकांचे वारे जोराने वाहण्यास सुरुवात होईल.

लोकसभा आणि नंतर विधानसभा निवडणुकांमुळे ग्रामपंचायतींच्या निवडणुका मागे पडल्या होत्या. जिल्ह्यात ८०९ ग्रामपंचायतींपैकी तब्बल २४० ग्रामपंचायतींच्या निवडणुका एकाचवेळी होणार आहेत. विधानसभा निवडणुकीपासूनच ग्रामपंचायतीसाठी इच्छुक उमेदवारांनी मोर्चेबांधणी सुरू केली होती. विधानसभा निवडणुकीत हार पत्कराव्या लागलेले उमेदवार नाउमेद न होता ग्रामपंचायतीच्या निवडणुकांसाठी पुन्हा जोमाने कामाला लागले आहेत. त्याचबरोबर प्रशासकीय स्तरावरही निवडणुकांची तयारी सुरू झाली आहे.

जानेवारीमध्ये निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आतापासूनच इच्छुकांनी निवडणूक लढविण्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची जुळवाजुळव करण्यास सुरुवात केली आहे. जिल्ह्यातील आकारमानाने मोठ्या ग्रामपंचायतींत सरपंचपदासाठी इच्छुकांमध्ये रस्सीखेच होण्याची शक्यता आहे. सरपंचपदाची निवडणूक थेट मतदारांमधून होणार असल्याने, ग्रामपंचायत निवडणुकांनाही गेल्या काही वर्षांत आमदारकीच्या निवडणुकीसारखे ग्लॅमर येत आहे.

अलिबागमधील चेंढरे, थळ, पनवेल तालुक्यातील गव्हाण, पोयंजे, वावंजे, कर्जतमधील शेलू, कशेळे, नेरळ यांसारख्या ग्रामपंचायतींचा महसूल जिल्ह्यातील काही नगर पंचायतींपेक्षा जास्त आहे. त्यामुळे येथील सरपंचपदाची निवडणूक जिंकून ग्रामपंचायतीवर एकहाती सत्ता मिळवण्याचा राजकीय पक्षांचा प्रयत्न असतो, त्यामुळे या ग्रामपंचायतींचा निवडणूक कार्यक्रम कधी जाहीर होणार, याची सर्वांना प्रतीक्षा आहे. मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींचा कारभार प्रशासकाद्वारे चालवला जात आहे.

**विधानसभा निवडणुकीचे पडसाद**

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीचे पडसाद ग्रामपंचायत निवडणुकांवर पडण्याची शक्यता आहे. विरोधी पक्ष कमकुवत झाल्याने कोणत्याही एका पक्षाच्या झेंड्याखाली निवडणूक न लढवता स्थानिक विकास आघाड्या स्थापन करून निवडणुका लढवण्याची जास्त शक्यता आहे. २०१९ पूर्वी रायगड जिल्ह्यातील बहुतांश ग्रामपंचायती या शेतकरी कामगार पक्ष आणि शिवसेनेच्या ताब्यात होत्या. शेकापला विधान परिषदेमध्ये मोठी हार पत्करावी लागल्याने त्याचा फटका स्थानिक कार्यकर्त्यांनाही पान ४ वर ▶▶

# मुंबई-नाहूरमध्ये दिवसभर ढगाळ वातावरण

दै.ठाणे जीवनदिप वार्ता/मुलुंड(प्रतिनिधी) :

ता.४: मुंबई मुलुंड नाहूरगाव येथील हवामान आज दिवसभर ढगाळ व अंधारमय असे होते पावसाळयात जसे ढगाळ वातावरण निर्माण होते तसाच अनुभव आज मुलुंड येथे आला गार वारे आणि घरात लाईट लावण्याची इतका अंधार दाटला होता साधारण संध्याकाळी सहा नंतरचे चित्र दिवसभर राहीले जणू सुर्यदेव ढगात लपून बसलेत की काय असे दृश्य पहाण्यात आले तापमान ३०° सेल्सिअस असे दाखवत होते पण तरीही उष्ण तापमानात ही गारठा जाणवत आहे दक्षिण गोलार्धात सर्वात लांब दिवस २२डिसेंबर विंटर सॉलिस्टिक दिवस मोठा मानला जातो.

# ठाणे ग्रामीण भागातील १५ बालविवाह रोखण्यात यश



दै.ठाणे जीवनदिप वार्ता
ठाणे(प्रतिनिधी) :

ता.४: एकीकडे देशात मुलींच्या शिक्षणासाठी कोट्यावधींच्या निधीसह विविध योजना राबवल्या जात असल्या तरी आजही जिल्ह्यात शिक्षण सुटल्याने मुलींच्या लग्नगाठी बांधल्या जात असल्याचे दिसून आले आहे. ठाणे जिल्ह्यात गेल्या वर्षभरात १५ बालविवाह रोखण्यात यश आल आहे. यातील जवळपास सर्वच मुलींचे शिक्षण थांबले होते. मुलींची सुरक्षितता आणि भविष्याचा विचार करून पालकांनी मुलींचे लग्न लावणे पसंत केल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे सर्व कुटुंब गरीब पार्श्वभूमीतून येतात.

ठाणे जिल्ह्यातील शहापूर हा आदिवासी तालुका म्हणून ओळखला जातो. तर मुरबाडमध्येही आदिवासींची संख्या मोठी आहे. आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या या समाजात मुलींची लग्न लवकर लावून देण्याचे अनेक प्रकार दिसून येतात. यासह शहरी भागातही आर्थिक चणचण असलेल्या कुटुंबांमध्ये लहान वयात मुलींच लग्न करण्याचे प्रकार समोर आले आहेत. जिल्हा महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून गेल्या काही महिन्यात ठाणे जिल्ह्यात १५ बालविवाह रोखण्यात यश आले आहे. यातील १२ बालविवाह शहापूर आणि मुरबाड तालुक्यातील आहेत. तर टिटवाळा, भिवंडी आणि नवी मुंबई येथील प्रत्येकी एक बालविवाह रोखला आहे. विशेष म्हणजे ठाणे जिल्ह्यात गेल्या पाच वर्षात यंदा सर्वाधिक बालविवाह रोखण्यात आल्याचे दिसून आले आहे. यातील काही विवाह विवाहाच्या आदल्या दिवशी, काही विवाह हळदीच्या तर काही विवाह थेट लग्नाच्या दिवशी रोखण्यात आले आहेत. विशेष म्हणजे जे १५ विवाह रोखण्यात आले त्या सर्व विवाहांमध्ये मुली अल्पवयीन होत्या. तर सर्वच मुलींचे शिक्षण विवाहावेळी थांबलेले होते. या सर्व मुली १३ ते १७ या वयोगटातील होत्या. त्यामुळे शिक्षण सुटली की लग्नगाठ नक्की अशीच काहीशी स्थिती दिसते आहे.

**सुरक्षित शिक्षण गरजेचे -** मुरबाड आणि शहापूर तालुक्यांमध्ये आदिवासी समाजासाठी काम करणाऱ्या श्रमिक मुक्ती संघटनेच्या इंदवी तुळपुळे यांना या बालविवाहाबद्दल विचारले असता त्यांनी सुरक्षित शिक्षणाअभावी बाल विवाह होत असल्याची बाब अधोरेखीत केली आहे. मुलींचे शिक्षण थांबले की त्यांचे लग्न लावून दिले जात असल्याचे आमच्या निदर्शनास आले आहे. शिक्षण थांबले की मुलींची सुरक्षितता हा प्रश्न कुटुंबांपुढे येतो. त्यामुळे मुलींच्या सुरक्षित शिक्षणासाठी पाऊले उचलणे आवश्यक आहे. असे इंदवी तुळपुळे यांनी सांगितले आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न

ADMISSION OPEN 2024-25

११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE

UNDER GRADUATE: B.A. | B.Com. | B.Sc. CHEMISTRY | B.Sc. MATHS | BAF | BMS

POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY | M.Com. ADVANCED ACCOUNTANCY | M.A. MARATHI | M.A. ECONOMICS | M.A. SOCIOLOGY | M.A. HISTORY

Look forward to a BRIGHTER FUTURE

7719814142
9130580111

# आमदार किसन कथोरेंना शुभेच्छा देण्यासाठी कार्यकर्त्यांची गर्दी



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**मुरबाड(प्रतिनिधी) :**
मुरबाड विधानसभेचे विकास पुरुष कार्य सम्राट आमदार किसन कथोरे हे पाचव्यांदा भरघोस मतांनी मुरबाड विधानसभेतून निवडून आले असल्याने आज ते मतमोजणी नंतर प्रथमच मुरबाड येथील त्यांच्या कस्तुरी या निवासस्थानी आले असता त्यांना भेटण्यासाठी व शुभेच्छा देण्यासाठी भाजपाचे पदाधिकारी व शेकडो पुरुष व महिला कार्यकर्ते यांनी एकच गर्दी केलेली पाहायला मिळाली.

यावेळी आलेल्या कार्यकर्तानी आमदार किसन कथोरे यांना पेढे भरवून तसेच बुके देऊन पुढिल आमदारकिच्या कारकिर्दी ला व साहेब मंत्री बनण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचा १३४ वा स्मृतिदिन साजरा

दै.ठाणे जीवनदिप वार्ता
कल्याण(प्रतिनिधी) :
सावित्री बाई ज्योतिबा फुले शिक्षण सहाय्यक मंडळ कल्याण या संस्थेच्या विद्यमाने क्रांती सुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचा १३४वा स्मृतिदिन, माळी समाज मंदिर, रामदास वाडी सिंधीकेट, कल्याण येथे रविवारी साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे खासदार सुरेश म्हात्रे, विधानपरिषद आमदार ज. मो. अभ्यंकर, मुख्य विश्वस्त अखिल भारतीय माळी समाज प्रबोधन व शिक्षण संस्था पुणे पद्मकांत कुदळे, अध्यक्ष दिलीप राऊत, सत्कार मूर्ती प्रमिला माळी, देणगीदार डी. के. माळी, राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय माळी, महासंघ. विमल खैरनार अध्यक्षा



सावित्रीबाई ज्योतीराव फुले महिला मंडळ कल्याण आदी मान्यवर उपस्थित होते.या प्रसंगी संस्थेच्या सभागृहास आई साहेब प्रमिलाताई दशरथ माळी सभागृह नामकरण फलकाचं उदघाटन खासदार व आमदार यांच्याहस्ते करण्यात आले.

पदवी पदवीका, विशेष प्रावीण्य प्राप्त अश्या विद्यार्थ्यांचा गुण गौरव करण्यात आला. सेवानिवृत समाज बांधव भगिनीचा सत्कार करण्यात आला. समाजातील जेष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला. खासदार सुरेश म्हात्रे यांनी सावित्रीबाई फुले यांचा पुतळा सावित्रीबाई चौकात उभारण्यात येईल असे आश्वासन दिले. आमदार व पद्मकांत कुदळे यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांचं कार्य अभ्यास पूर्वक रीतीने मांडले.या कार्यक्रमाचे सभाध्यक्ष पी जी माळी होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्याणकर माजी अध्यक्ष राम चौधरी कार्याध्यक्ष यांनी केले. आभारप्रदर्शन विश्वस्त मुकुंद माळी यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपाध्यक्ष शरद महाजन, सरचिटणीस सुधाकर महाजन, खजिनदार नितीन चौधरी, माजी अध्यक्ष हिरामण बच्छाव, विश्वस्त संतोष सोनवणे, विभागीय उपाध्यक्ष प्रशांत माळी, विश्वस्त संजय पाटील, माजी कार्याध्यक्ष रमेश महाजन, हॉल समिती अध्यक्ष प्रकाश महाजन, चिटणीस बी टि महाजन, वसंत माळी व सर्व कार्यकारिणी विश्वस्त मंडळ, मॅनेजर अहिरराव मुखेडकर शेटे, डेकोरेटर यांनी परिश्रम घेतले.

# सभापती मनीषा निमकर यांच्याकडे नियमित शिक्षकांची मागणी



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/पालघर(ऋषीकेश जाधव)**
जिल्हा परिषद गट सफाळे मधील नवघर ग्रामपंचायत येथील तळेखल या दुर्गम आदिवासी भागातील प्राथमिक शाळेचे विद्यार्थी आणि पालक यांनी समाज कल्याण सभापती मनीषा निमकर यांची भेट घेऊन शाळेला नियमित शिक्षक द्यावा अशी मागणी केली. तळेखल या शाळेमधील शिक्षिका प्रसूती रजेवर गेल्या असल्याने तेथे नियमित शिक्षक येत नाहीत त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने शाळेचे विद्यार्थी आणि पालक यांनी सभापती मनीषा निमकर यांची भेट घेऊन तळेखल शाळेवर नियमित शिक्षक देण्याची मागणी केली.

तसेच नियमित शिक्षक नसल्याने विद्यार्थ्यांना मिळणारा पोषण आहार देखील काही दिवसापासून बंद असल्याची खंत यावेळी पालकांनी केली. या शाळेवर आळीपाळीने शिक्षक येतात परंतु ते शाळा लवकर बंद करून निघून जातात त्यामुळे मुलांचे शिक्षण अपूर्ण राहते,असे पालकांनी यावेळी सांगितले.

सभापती मनीषा निमकर यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून त्वरीत या शाळेसाठी शिक्षक देण्यात यावे असे आदेश देण्यात आले. अन्यथा सर्व विद्यार्थी, शिक्षण अधिकारी यांच्या दालनात येऊन शाळा भरवतील, तसेच त्यांच्या जेवणाचा व राहण्याचा खर्च शिक्षण विभागाने उचलावा असा इशारा यावेळी सभापती मनीषा निमकर यांनी दिला. यावेळी यावेळी सुरेश तरे माजी बांधकाम व आरोग्य सभापती योगेश पाटील माजी जिल्हा परिषद सदस्य ,प्रमोद शेलार माकणे सरपंच,दर्शन पाटील उपसरपंच नवघर घाटीम, शिक्षण विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# वैद्यकीय खर्चाची बीले प्राधान्याने मंजूर करावी
## – सुधीर घागस

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**ठाणे(प्रतिनिधी) :**
अनुदानित शाळांमधील कर्मचाऱ्यांना शासनाकडून वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळत असते. ठाणे जिल्ह्यातील अनुदानित शाळांची व त्यातील कर्मचाऱ्यांची संख्या जास्त आहे. त्यामुळे साहजिकच कर्मचाऱ्यांना वैद्यकीय देयकांची रक्कम मिळताना अतिविलंब होत आहे. कर्मचारी अथवा त्यांच्या कुटुंबीयांच्या आजारपणासाठी कर्मचाऱ्यांनी कर्ज काढून अथवा उसनवार घेऊन खर्च केलेला असतो. त्यामुळे तो खर्च त्याला तातडीने मिळावा अशी त्याचे अपेक्षा असते. सन २०२१ -२२, २०२२ -२३ व २०२३ - २४ पासून ही काही वैद्यकीय बिले अद्यापही प्रलंबित आहेत. याकरिता असलेल्या शिल्लक अनुदानातून तातडीने जेष्ठता क्रमानुसार बिले मंजूर करावी. अनुदान मंजुर नसल्यास आपण विशेष प्रयत्न करून ती मिळवावी व वैद्यकीय खर्चाच्या प्रतिक्षेत असलेल्या कर्मचाऱ्यांना बिले मंजूर करून दिलासा द्यावा अशी मागणी शिक्षण क्रांती संघटनेचे राज्य अध्यक्ष सुधीर घागस व देवानंद पाटील यांनी वेतन व भविष्य निर्वाह निधी पथकाचे प्रभारी अधीक्षक दिलीप घनघाव यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# नांदिवली, भोपर, आणखी ग्रामीण भागातील पाणी समस्या दोन महिन्यात संपणार

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**कल्याण(प्रतिनिधी) :**
कल्याण ग्रामीणचे नवनिर्वाचित आमदार राजेश गोवर्धन मोरे यांनी कामाचा सपाटा लावला असून, कल्याण ग्रामीण भागातील नागरिक सुद्धा राजेश मोरे यांच्याकडे समस्या सोडवण्यासाठी रांगा लावत आहे आमदार मोरे प्रत्येक व्यक्तीला वेळ देऊन त्याचे सर्व प्रश्नांवर ताबडतोब त्यावर उपाय योजना करतात आणि संबंधित महापालिका अधिकाऱ्यांशी चर्चा करून प्रश्न निकाली काढतात. नांदिवली ग्रामीण भागातील शिवसेना पदाधिकारी अनिल म्हात्रे साहेब यांनी नवनिर्वाचित आमदार राजेश मोरे यांची भेट घेऊन प्रभागाची पाणी समस्यांच्या बाबतीत चर्चा केली यावेळी आमदारांनी सर्वांना आश्वासित केले की आपली पाणी समस्या दोन महिन्याच्या संपुष्टाची तुम्ही थोडा धीर धरा पाच वर्षे धीर धरला ना आता थोडा वेळ धीर धरा तुमचा प्रश्न नक्की सोडवेल. यावेळी सर्व नागरिकांचे समाधान झाले आणि त्यांनी राजेश मोरे पुष्पगुच्छ देऊन आपल्या आनंदाच्या भावना व्यक्त केल्या.

## मुरबाडमध्ये १८६० कडधान्य भाजीपाला
# लागवड क्षेत्रापैकी ३३५ हेक्टरवर भाजीपाला पिकाची लागवड





शेतकरीवर्गाची कडधान्य व रब्बी पिक हंगामाची लगबग सुरू

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**मुरबाड(बाळासाहेब भालेराव):**
मुरबाड तालुक्यातील ग्रामीण आदिवासी पट्ट्यात तसेच मुरबाड शहर परिसरात वर्षाकाठी एकदाच भात पीक घेतलं जात आहे त्यानंतर अर्थात भात सराईनंतर मुरबाड तालुक्यात रब्बी पीक हंगामाला जोरदार सुरुवात होत असते त्याच धर्तीवर मुरबाड तालुक्यात एकूण कडधान्य व भाजीपाला लागवडीचे क्षेत्र १८६० हेक्टर पैकी ३३५ ट्रॅक्टरवर कडधान्य पिकाची लागवड करण्यात आली आहे. याबाबत म्हसा कृषी सहाय्यक कासाबाई बुळे यांनी प्रत्यक्ष शेतकऱ्याच्या शेतावर जाऊन त्यांना रब्बी पिक हंगामा संदर्भात चांगले मार्गदर्शन केले.

तसेच ३३५ हेक्टर वर भाजीपाला पिकाची लागवड मोठ्या प्रमाणात करण्यात आले आहे. तसेच रब्बी हंगाम पीक पेरणी मध्ये मूग, हरभरा, वाल,, उडीद, भुईमूग, भेंडी, काकडी, वांगी, इत्यादी पिकाची लागवड करण्यात आली आहे त्यासाठी तालुक्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणात रब्बी पिकाची काळजी घेत आहे कारण या कडधान्य व रब्बी पिकातूनच मिळणारे उत्पन्न याच उत्पन्नावर आपल्या कुटुंबाची आर्थिक घडी बसली जाते. रब्बी हंगामात शेतकरी वर्ग आपल्या वेगवेगळया भाजीपाल्या पिकाच्या बाबत व्यस्त असतो त्याचमुळे मुरबाडची ढोबळी मिरची, तसेच भेंडी व काकडी ही एअरपोर्टवर जात असल्याने मुरबाडच्या भाजीपाल्या पिकाला विशेष महत्त्व दिले जात आहे.

रब्बी हंगाम पिक पेरणी पुढील प्रमाणे:-

| पिकांची नावे | हेक्टरी लागवड |
|---|---|
| उडीद | ४.०० |
| मुग | १५.५० |
| हरबरा | १०० |
| भुईमूग | २.९ |
| वांगी | ७.५० |
| भेंडी | ६०.०० |
| काकडी | १०.०० |
| वाल | १९० |

अशाप्रकारे मुरबाड तालुक्यात रब्बी पिक हंगामाद्वारे विविध पिकांची लागवड करण्यात आली आहे सदर मुरबाड तालुक्यात कडधान्य व भाजीपाला पिकाची लागवड सध्या ३३५ हेक्टरवर करण्यात आल्याची माहिती मुरबाड तालुका कृषी अधिकारी नामदेव धांडे यांनी दिली आहे.

# मुख्याध्यापिका मधुरा पाटील यांचा सेवापुर्ती सत्कार समारंभ संपन्न



**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता**
**शहापूर ग्रामिण(नरेंद्र पाटील)**
खंबाळा विभाग हायस्कूल खंबाळा येथील मुख्याध्यापिका मधुरा तुळशिराम पाटील यांच्या सेवापुर्ती निमित्ताने विभाग हायस्कूल खंबाळा येथे दि.२७ नोव्हेंबर २०२४ रोजी पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नति मंडळाचे सर्व व्यवस्थापन समितीचे सदस्य,विश्वस्त व शिक्षक वृंदाच्या वतीने सत्कार सोहळ्याचे आयोजन करून त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शालेय समितीच्या चेअरमन सुधाताई नारायण पाटील उर्फ नानी यांनी स्विकारले व प्रमुख पाहुणे म्हणुन पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नति मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय जाधव तसेच मान्यवर उपस्थित होते. डॉ. विजय जाधव यांनी आपल्या मनोगतातून विद्यालयातील विध्यार्थ्यांसाठी सर्वांगीण विकासासाठी लागणाऱ्या शैक्षणिक सुविधा, तसेच संरक्षण भिंत बांधण्याचे आश्वासन दिले यासाठी शिक्षक वर्गाने सर्वच विध्यार्थ्यांसाठी आणि विशेषतहा इ १०वीच्या विद्यार्थीसाठी विशेष मार्गदर्शकाची भूमिका पार पाडावी अशी अपेक्षा व्यक्त केली. तर सरचिटणीस आर. एन. पिंजारी यांनी आपल्या मनोगतातुन मॅडमने त्यांच्या कार्यकाळात केलेल्या भरीव कार्याचा गवगवा करून लग्नाच्या शुभकार्यापासून ते त्यांच्या निरोप समारंभ पर्यंतच्या जिवनाचा परिचय करून दिला.कार्याध्यक्ष बी.डी. काळे, उपाध्यक्षा अरुणा प्रकाश जाधव, उपाध्यक्ष श्रीराम नागो भोईर,जी.आर. पाटील, ॲड. रोहीत जाधव,खजिनदार जे. डी. भोईर, सहखजिनदार के. के. डावकर, विश्वस्त डॉ. नरेश जाधव,पद्माकर केवारी, भरत सावंत, जनार्दन जव्हारकर हरीराम शिडुनकर, आर-अशोक हिवरे महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माजी अध्यक्षा शिवसेना उपनेत्या डॉ. ज्योती ठाकरे, खंबाळा ग्रुप ग्रा.पं सरपंच नंदा चंद्रकांत वाघे, केंद्र प्रमुख दाभाड-शामसुंदर दोंदे यांतील अनेकांनी याप्रसंगी आपल्या भावना व्यक्त केल्या व मधुरा पाटील यांचा यथोचित सन्मान करुन त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमा प्रसंगी मुख्याध्यापिका पाटील मॅडम यांनी विद्यालयास साऊंड सिस्टीम, व पद्मश्री अण्णासाहेबांची प्रतिमा भेट म्हणून दिली.कार्यक्रमाचे सूत्र संचलन व आभार यु.डी. महाजन, डी. एस. ठाकरे यांनी केले तसेच कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षकवृंदाने,खुप मेहनत घेतली.

# प्राथमिक शिक्षक शरद कंटे यांचा सेवापुर्ती सोहळा संपन्न




**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**मुरबाड(दिलीप पवार) :**
मुरबाड तालुक्यातील तुळई सारख्या ग्रामीण भागात पदवी पर्यतचे शिक्षण घेऊन वडीलांचा शिक्षकि पेशा पुढे चालविण्यासाठी डि.एड.अभ्यास क्रमाचि पदवी घेऊन शिक्षक होऊन पवित्र ज्ञानदानाचे काम करणारे आदर्श शिक्षक शरद दत्तात्रय कंटे नियत वयोमानुसार ३१ वर्ष जि. प.प्राथमिक शिक्षकाच्या सेवेतून ५८ व्या वर्षी ३० नोव्हेंबरला तालुक्यातील काचकोळि या शाळेवर असताना सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्या सेवापुर्ति सोहळयासाठी तालुक्यातील विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्ती उपस्थित राहून त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी मुरबाड तालुका कुणबी समाजोन्नती मंडळाचे अध्यक्ष गणपत विशे यांनी अजूनही आपल्याला समाज परिवर्तनाची गरज आहे. सोहळयासाठी आलेल्या उपस्थित नातेवाईक, मित्र परिवार यांनी शाळ, बुके, भेटवस्तू न आणता यातून गरजु मुलांसाठी शाळेय शैक्षणिक साहित्य तसेच इतर सामाजिक गोष्टी साठी खर्च केला तर त्या शुभेच्छा सार्थकी लागतील अशा प्रकारे भावनिक आवाहन यावेळी केले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष उल्हास बांगर यांनी शिक्षक शरद कंटे यांच्या शैक्षणिक कार्याचि स्तुती करून शुभेच्छा दिल्या. यावेळी मुरबाड नगरपंचायत चे माजी नगराध्यक्ष मोहन सासे, रामभाऊ दुधाळे, नगरसेविका मधुरा सासे, पंचायत समिती शिक्षण विभागाचे विस्तार अधिकारी संजय थोरात,सुरेश साबळे, यादव पवार, आण्णा इसामे, कृष्णकांत मलिक यांच्या सह मोठ्या संख्येने शिक्षक, शिक्षिका व नातेवाईक उपस्थित होते. या कार्य क्रमाचे सदाबहार सुत्रसंचालन शिक्षक वसंत घावट यांनी केले तर प्रास्ताविक संजय घागस यांनी केले.

# 'नॅशनल कॉम्प्युटर पेण' च्या संचालिका स्मिता शेळके बिझनेस ग्रोथ पुरस्काराने सन्मानित

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/**
**पेण(प्रतिनिधी) :**
पेण तालुक्यातील नॅशनल कॉम्प्युटर सेंटरच्या संचालिका स्मिता शेळके यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल 'Business growth अवॉर्ड'ने सन्मानित करण्यात आले आहे. ३० नोव्हेंबर २०२४ रोजी, एमकेसीएलच्या संचालिका वीणा कामत यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

**१९९५ साली सुरू केलेली वाटचाल आज जिल्ह्यात अव्वल स्थानी**
१९९५ साली नॅशनल कॉम्प्युटर सेंटरची सुरुवात एका लहान रोपट्याप्रमाणे करण्यात आली होती. मात्र, स्मिता शेळके यांच्या अथक परिश्रमांमुळे आज हे केंद्र एक वटवृक्ष बनले आहे. जिल्ह्यातील प्रमुख आणि अग्रगण्य प्रशिक्षण केंद्र




म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या संस्थेने शिक्षण क्षेत्रात नवा मापदंड निर्माण केला आहे. अभ्यासक्रमांची विस्तृत श्रेणी नॅशनल कॉम्प्युटर सेंटरमध्ये MS-CIT या प्रमाणित अभ्यासक्रमा सोबतच D.T.P, Tally Prime with GST, Advance Excel, Klick Diploma, Autocad, C & C++, Marathi- English Typing Etc. यांसारखे व्यावसायिक कोर्सेस दिले जातात. वर्षभरात हजारो विद्यार्थी या केंद्रामध्ये प्रशिक्षण घेत असतात.

**केंद्राची वैशिष्ट्ये**-उत्तम प्रशिक्षकः तज्ज्ञ आणि अनुभवी प्रशिक्षकांचा दर्जेदार मार्गदर्शन.सुसज्ज लॅबः आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज संगणक प्रयोगशाळा. मुबलक पावर बॅकअपः अखंडित शिक्षणासाठी वीज पुरवठ्याची खात्री.

**स्मिता शेळके यांचा प्रेरणादायी प्रवास**
स्मिता शेळके यांनी आपल्या मेहनती आणि दूरदृष्टीच्या जोरावर नॅशनल कॉम्प्युटर सेंटरची घवघवीत प्रगती साधली आहे. त्यांचे कार्य केवळ पेण तालुक्यातच नव्हे, तर संपूर्ण जिल्ह्यात विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक ठरत आहे.

**पुरस्काराचे महत्त्व-** MKCLच्या संचालिका वीणा कामत यांनी स्मिता शेळके यांच्या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, 'नवीन पिढीला डिजिटल शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम बनविण्यासाठी स्मिता शेळके यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांच्या कार्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना रोजगार आणि व्यवसायाच्या संधी मिळाल्या आहेत.' पुरस्कार स्वीकारल्यानंतर स्मिता शेळके म्हणाल्या की 'हा सन्मान माझ्या आणि माझ्या टीमच्या मेहनतीचे प्रतीक आहे. शिक्षण आणि तंत्रज्ञान क्षेत्रात नव्या पिढीला घडविण्यासाठी आम्ही भविष्यातही तत्पर राहू.'स्मिता शेळके यांचा हा सन्मान जिल्ह्यातील इतर उद्योजकांसाठी प्रेरणादायी ठरला आहे.

# बंडू खंडागळे रायगड जिल्हा संघटक पदी



**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता**
**पेण(प्रतिनिधी)**
पेण येथील सामाजिक कार्यकर्ते बंडू विरेश्वर खंडागळे यांची मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेयर्स भारत सरकार मान्यताप्राप्त माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समिती आणि पोलीसमित्र फाउंडेशन संचलित माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समिती महाराष्ट्र राज्य अध्यक्ष महेश सारणीकर यांनी नुकतीच रायगड जिल्हा संघटक पदी नियुक्ती केली आहे.

बंडू खंडागळे यांनी सामाजिक कार्यामध्ये गेली अनेक वर्ष काम केले आहे. समाज बांधवांचे कामकाजातील अडथळे कायदेशीर मार्गाने दूर करण्यासाठी सातत्याने पुढाकार घेत असतात. रोजगार आणि शिक्षण क्षेत्रात नवयुवक तरुणांसाठी त्यांचे मोलाचे मार्गदर्शन असते. आरोग्याच्या बाबतीमध्ये गरजू समाज बांधवांसाठी मदत मिळून देणे तसेच योग्य मार्गदर्शन मोफत अनेक वर्ष केले आहे, आणि आजही करीत आहेत. समाज बांधवांच्या आपापसातील कौटुंबिक वाद मिटवण्यासाठी निश्चित त्यांचा त्यांचा पुढाकार असतो. अनेक वेळा स्थानिक नागरी सुविधा जनतेला मिळवण्यासाठी त्यांनी केलेले काम कौतुकास्पद आहे. त्यांची माहितीचा अधिकार व पत्रकार संरक्षण समिती रायगड जिल्हा संघटक पदी निवड झाल्याने त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. त्यांच्या या जबाबदारीतून निश्चित भविष्यातील रायगड जिल्ह्यातील माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समिती साठी समाजबांधवांचे सर्वसाधारण जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी निश्चितच बंडू खंडागळे अतिशय प्रामाणिकपणे प्रयत्न करतील. या पुढील काळात माहितीचा अधिकार आणि पत्रकारिता क्षेत्रात कार्य करत असताना येणाऱ्या अडीअडचणी सोडवत माहिती अधिकार आणि पत्रकारितेची चळवळ सक्षम आणि सशक्त करण्याच्या हेतूने महाराष्ट्र राज्य कार्यकारणीच्या मार्गदर्शनात आणि सहमतीने राष्ट्राची लोकशाही विचारधारा यशस्वी करण्यासाठी माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीची ध्येयधोरणे लोकशाही भारताच्या शाश्वत विकासासाठी राबविण्याची जबाबदारी बंडू खंडागळे यांच्या वरती आहे. त्यांच्या नियुक्तीसाठी पुणे येथील शहर उपाध्यक्ष-राजेंद्र शिर्के यांनी शिफारस केली असून त्यांची रायगड जिल्हा संघटक माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीच्या नियुक्तीने सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.




## दैनिक राशिफल
०४ डिसेंबर २०२४
बुधवार

**मेष**
तुमच्या कौटुंबिक जीवनात सुसंवाद वाढेल. आज तुम्हाला काही मोठी जबाबदारी पार पाडावी लागेल. आज तुम्हाला आर्थिक लाभाची संधी मिळेल. तुमची आर्थिक

**वृषभ**
तुम्ही आरोग्याशी संबंधित कोणत्याही समस्येबाबत चांगल्या डॉक्टरांशी संपर्क साधाल.विद्यार्थ्यांना त्यांच्या मेहनतीचे चांगले फळ मिळेल.

**मिथुन**
आज तुम्ही कोणाकडून घेतलेले कर्ज परत कराल.तुमची आर्थिक परिस्थिती मजबूत होईल, तुमची आधीच सुरू असलेली एचख आज पूर्ण होईल.

**कर्क**
स्थिती मजबूत होईल. वैवाहिक जीवनात परस्पर स्नेह वाढेल. सर्व त्रासांपासून आराम मिळेल. नातेवाईकाला दिलेले पैसे परत मिळतील.

**सिंह**
वैवाहिक जीवनात आनंदाचे वातावरण राहील. आज तुम्ही धार्मिक कार्यात उत्साहाने सहभागी व्हाल. धार्मिक विधीत सहभागी होण्याची संधी मिळू शकते.

**कन्या**
फॅशन डिझायनर्ससाठी आजचा दिवस चांगला राहील.वैवाहिक जीवनात मधुरता वाढेल. तुमच्या कौटुंबिक परिस्थिती पूर्वीपेक्षा अधिक अनुकूल होईल.

**तूळ**
मीडिया क्षेत्राशी संबंधित लोकांना आज चांगला फायदा होईल. खाजगी नोकरी करणाऱ्यांना आज प्रमोशनशी संबंधित चांगली बातमी मिळू शकते.

**वृश्चिक**
तुमची आर्थिक स्थिती मजबूत होईल. तुम्हाला तुमच्या कार्यक्षेत्रात यश मिळेल, अडथळ्यांनी भरलेली कामे पूर्ण होतील. वैवाहिक जीवनात समन्वय वाढेल.

**धनु**
आज तुम्हाला मुलांकडून काही चांगली बातमी मिळेल.तुम्ही तुमच्या खाण्याच्या सवयींची विशेष काळजी घ्यावी. तुमच्या उत्पन्नाच्या तुलनेत तुमचे खर्च वाढतील.

**मकर**
आज तुम्हाला मुलांकडून आनंद वाटेल. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना आज थोडी मेहनत करावी लागेल, यश मिळण्याची शक्यता आहे.

**कुंभ**
तुमचे कुटुंबीय काही कामासाठी तुमची प्रशंसा करतील. विद्यार्थ्यांची अभ्यासात आवड वाढेल. तुमच्या नोकरीत काही सकारात्मक बदल होतील.

**मीन**
आज काही नवीन कामात तुमची रुची वाढेल. विद्यार्थी आज आपल्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करतील.तुमचे शौर्य वाढेल. प्रयत्न यशस्वी होतील.

# जमिनीच्या वादातून केडीएमसीच्या सफाई कामगाराला शिवीगाळ करत मारहाण



## पोलीस ठाण्यात 'अॅट्रॉसिटी' कायद्यांतर्गत अंतर्गत गुन्हा दाखल

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी) :** टिटवाळा नजीक असलेल्या मानिवली उंभर्णी कल्याण डोंबवली महानगरपालिकेच्या सफाई कामगाराला जातीवाचक शिवीगाळ करत मारहाण केली असून बंदुकीचा धाक दाखवत जीवे ठार मारण्याची धमकी दिली आहे. या प्रकरणी कल्याण तालुका पोलीस ठाण्यात अॅट्रॉसिटी कायद्यांतर्गत अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उंभर्णी गावातील अनुसूचित जातीचे रहिवासी एकनाथ पवार यांनी मानिवली येथील त्यांच्या जमीन विक्रीचा व्यवहार रद्द केल्याचा राग मनात धरून गावातील नीलेश शेलार आणि रवी नामक गावगुंडांनी रस्ता आडवुन त्यांना जातीवाचक शिवीगाळ केली. याचा जाब विचारला असता त्यांना मारझोड करण्यात आली. मोटारसायकलची चावी काढून घेवुन कमरेला रिव्हॉल्वर लावून जीवे ठार मारण्याची धमकी दिली. कल्याण तालुका पोलीस ठाण्यात संबंधितांवर रात्री उशिरा अॅट्रॉसिटी व इतर प्रचलित कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निलेश शेलार हा राजकीय पक्षाशी संबंधित असून त्याच्यावर याआधी देखील अनेक गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे निलेश शेलार सह त्याच्या साथीदाराला पोलिसांनी लवकरात लवकर अटक करावी अशी मागणी एकनाथ पवार यांनी केली आहे. आरोपींना त्वरित अटक करावी अन्यथा टिटवाळा पोलिस स्टेशन मध्ये आमरण उपोषण करण्याचा इशारा एकनाथ पवार यांनी दिला आहे. तर टिटवाळा पोलिसांनी कामगाराच्या कुटुंबियाला पोलिस संरक्षण दिले आहे.



# भारतीय नौदल दिन

आज भारतीय नौदल दिन. भारतीय नौदलातर्फे दरवर्षी ४ डिसेंबर हा दिवस भारतीय नौदल दिन म्हणून साजरा केला जातो. त्याआधीचा पूर्ण सप्ताह हा देशभरात नौदल सप्ताह म्हणून साजरा केला जातो. ४ डिसेंबर याच दिवशी नौदलदिन का साजरा केला जातो हे जाणून घेऊया. १९७१ सालच्या सुरवातीपासूनच भारत आणि पाकिस्तानमध्ये कमालीचा तणाव निर्माण झाला होता. तत्कालीन पूर्व पाकिस्तान मधून पाकिस्तानी हवाईदल सातत्याने भारतीय हद्दीत घुसखोरी करत होते. भारताने अनेकदा इशारे देऊनही पाकिस्तान आपली खोड मोडायला तयार नव्हते. १९७१ च्या एप्रिल महिन्याच्या सुमारासच युद्ध पुकारण्यासदृश परिस्थिती निर्माण झाली होती. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी या पार्श्वभूमीवर सैन्य दलांच्या अधिकाऱ्यांची बैठक बोलावली या बैठकीला मंत्रिमंडळातील सर्व सदस्य उपस्थित होते. लष्करप्रमुख सॅम माणेकशॉ यांनी या बैठकीत स्पष्ट सांगितले की सध्याची परिस्थिती आणि ऋतू हे आपल्यासाठी अनुकूल नसल्याने सध्यस्थितीत युद्ध आपल्याला परवडणारे नाही. युद्धासाठी नोव्हेंबर पर्यंत थांबावे लागेल. नोव्हेंबर पर्यंत सैन्याची जुळवाजुळव व्यवस्थित करता येईल याची खात्री देण्यासही ते विसरले नाही. खरंतर एप्रिलमध्येच युद्ध व्हावे या मताच्या इंदिरा गांधी होत्या पण लष्करप्रमुखांनी परिस्थिती विषद केल्यानंतर नोव्हेंबर पर्यंत थांबण्याचा निर्णय पंतप्रधान आणि मंत्रिमंडळाने घेतला. त्यामुळे आपण काहीही केले तरी भारत आपल्याला उलट उत्तर देऊ शकणार नाही अशा आविर्भावात पाकिस्तान वावरू लागला. त्यांनी ३ डिसेंबर रोजी भारतीय सीमाभागावर पूर्व आणि पश्चिम पाकिस्तानातून जोरदार हल्ले चढवले. त्याचवेळी भारतीय विमानवाहक युद्धनौका आयएनएस विक्रांतला सागरतळात बुडवण्याची योजना पाकिस्तानने आखली. पाकिस्तानची ही योजना भारतीय नौदलाच्या लक्षात आल्याने भारतीय नौदलाने चुकीचा संदेश पाठवून पीएनएस गाझी ची दिशाभूल केली आणि डाव साधला.

भारतीय नौदलाने चढवलेल्या हल्ल्यात गाझी या पाकिस्तानच्या पाणबुडीला जलसमाधी मिळाली.

भारताच्या आयएनएस विक्रांत ला सागर तळाशी पाठवण्याची स्वप्ने पाहणाऱ्या पाकिस्तानी नौदलाची सर्वात शक्तिशाली असलेली गाझी ही पाणबुडीच सागर तळाशी पोहचल्याने पाकिस्तानला मोठा धक्का बसला.

गाझी पाणबुडीला जलसमाधी मिळाल्यानंतर बंगालच्या उपसागरात आयएनएस विक्रांतने आपला दरारा पसरवला आणि पाकिस्तानी नौदलाचे कंबरडे मोडून काढले. आयएनएस विक्रांतवरील धावपट्टीचा वापर करत नौदलाच्या लढाऊ विमानांनी हल्ला चढवून पूर्वेकडे पाकिस्तानला डोकेही वर काढू दिले नाही. हे सुरू असतानाच पश्चिमी मुख्यालयाच्या नौदल ताफ्याने धाडसी नियोजन करुन लहान आकाराच्या नौकांच्या मदतीने छुप्या पद्धतीने पाकिस्तानी सागरी हद्दीत प्रवेश करत थेट कराची बंदरावरच हल्ला चढवला. पाकिस्तानी युद्धनौका, पाणबुड्या त्यांच्यावरील या अचानक झालेल्या हल्ल्याने हादरुन गेल्या. कराची बंदरावर थेट हल्ला होऊ शकतो, याची कल्पनाच पाकिस्तानी नौदलाने केली नव्हती. ३ व ४ डिसेंबरच्या मध्यरात्री भारतीय नौदलाने केलेल्या या हल्ल्याने पाकिस्तानचे कंबरडे मोडले आणि युद्धाचे पारडे भारताच्या बाजूने झुकले. त्यानंतर दहा दिवसांतच पाकिस्तानने शरणागती पत्करली. नौदलाच्या या पराक्रमाची आठवण म्हणून ४ डिसेंबर हा दिवस नौदल दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानंतर भारतीय नौदलाचा जगभरात दबदबा निर्माण झाला. अरबी समुद्र, बंगालचा उपसागर आणि दक्षिण महासागरात भारतीय नौदलाचे सामर्थ्य निर्माण झाले. आज भारतीय नौदल हे जगातील सर्वाधिक शक्तिशाली नौदल म्हणून ओळखले जाते. आज भारताचे नौदल हे जगातील पाचव्या क्रमांकाचे नौदल आहे. भारतीय नौदलाकडे एकूण ५५ युद्धनौका आणि ५८ हजार ३५० सैनिक आहेत. भारताकडे ९ विध्वंसक, १५ नौका, न्यूक्लिअर हल्ला करणारी एक पाणबुडी, १४ पारंपरिक पाणबुडीसह आधुनिक शस्त्रे आहेत म्हणूनच जगातील सर्वात शक्तिशाली नौदला मध्ये भारतीय नौदलाची गणना होते. भारतीय नौदलाला नौदल दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**- श्याम बसप्पा ठाणेदार**

# वामन म्हात्रे प्रतिष्ठानच्या माध्यमातून नागरिकांना मोफत भाजी वाटप



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :** सध्या भाजीपाल्याचे दर गगनाला भिडले असतांनाच वामन म्हात्रे प्रतिष्ठानच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना मोफत भाजी वाटप करत दिलासा दिला आहे. मार्गशीर्ष गुरुवार वैभव लक्ष्मी व्रत व समाजसेवक तथा शिवसेनेचे पदाधिकारी गोरखनाथ म्हात्रे यांच्या वाढदिवसानिमित्त डोंबिवली पश्चिमेतील गोपीनाथ चौक येथे हा मोफत भाजी वाटप स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला.

डोंबिवलीतील गोपीनाथ चौक, उमेश नगर, भरत भोईर नगर, गरिबांचा वाडा, महाराष्ट्र नगर, राहुल नगर, देवीचा पाडा परिसरातील हजारो नागरिकांनी याचा लाभ घेतला

.वामन म्हात्रे प्रतिष्ठानच्या वतीने वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात येतात. यामध्ये दिवाळीला फराळासाठी साखर, मैदा, रवा वाटप, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप यासह इतर कार्यक्रम आयोजित केले जातात. तर नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी देखील वामन म्हात्रे प्रतिष्ठान कार्यरत असते. त्याचाच एक भाग म्हणून आज मोफत भाजी वाटप करत नागरिकांना काहीसा दिलासा देण्यात आला.यावेळी गोरखनाथ म्हात्रे, कविता म्हात्रे, अनमोल म्हात्रे, पुर्विका म्हात्रे, गुरुंदीप म्हात्रे, मुकुंद म्हात्रे, गणेश पाटील, संदीप सामंत, मनोज वैद्य, अवि मानकर, राजू सावंत, रुपेश सोनाटे, राम म्हात्रे, लक्ष्मण म्हात्रे, मिलिंद मोहिते, अनिल कांबळे, संदीप दरेकर, संजना डोरलेकर, शुभांगी चोरघे, शालिनी मिरजकर, गीता मांडवकर आदी कार्यकर्त्यांनी हा उपक्रम यशस्वी केला.

# निरंकारी मिशनच्या वतीने ठाकुर्ली व ऐरोली येथे ३०७ युनिट रक्तदान

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी) :** सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या दिव्य मार्गदर्शनामध्ये आपले मानवसेवेचे ब्रिद निभावत संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या विद्यमाने रविवारी मिशनच्या डोंबिवली झोन अंतर्गत संत निरंकारी सत्संग भवन, गोळवली, ठाकुर्ली (पूर्व) आणि ट्रान्स हार्बर लाईनच्या ऐरोली रेल्वे स्थानकातील पश्चिम दिशेच्या तिकीटघराजवळ आयोजित दोन रक्तदान शिबिरांमध्ये एकंदर ३०७ निरंकारी भक्तांनी मोठ्या उत्स्फूर्तपणे रक्तदान केले.मिशनच्या डोंबिवली झोन अंतर्गत ठाकुर्ली (पूर्व) येथे १ डिसेंबर रोजी आयोजित रक्तदान शिबिरामध्ये ५९ निरंकारी भक्तांनी मोठ्या उत्साहाने रक्तदान केले ज्यामध्ये ४३ पुरुष व १६ महिला रक्तदात्यांचा समावेश होता. या शिबिरामध्ये संत निरंकारी रक्तपेढीकडून रक्त संकलित करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन कल्याण ग्रामीण क्षेत्राचे नव निर्वाचित आमदार राजेश मोरे आणि मिशनच्या डोंबिवली क्षेत्राचे प्रभारी रावसाहेब हसबे यांच्या हस्ते संयुक्त रूपात करण्यात आले. यावेळी स्थानिक मुखी कृष्णकांत कांबली यांच्यासह मिशनचे अनेक प्रबंधकगण व सेवादल अधिकारी उपस्थित होते.

तर ऐरोली स्थानकावर आयोजित रक्तदान शिबिराला उत्तम प्रतिसाद देत २४८ निरंकारी भक्तांनी मोठ्या उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. या शिबिरात संत निरंकारी रक्त पेढी, विलेपार्ले, मुंबई यांनी १५० यूनिट तर नवी मुंबई महानगरपालिका रक्त पेढी, वाशी यांनी ९७ यूनिट रक्त संकलित केले. उल्लेखनीय आहे, की संत निरंकारी मिशन सहसा आपली सत्संग भवनं, शाळा किंवा विविध सभागृहांमध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करत आले आहे; पण प्रथमच एखाद्या रेल्वे स्थानकावर हे आयोजन करण्यात आले ज्याला रक्तदात्यांनी उत्तम प्रतिसाद देऊन ते यशस्वी केले. ही बाब देखील मिशनला गौरवान्वित करणारी आहे, की आतापर्यंत भारतवर्षामध्ये सुमारे १३ लाखाहून अधिक युनिट रक्तदान मानव कल्याणार्थ करण्यात आले आहे.



या शिबिराचे उद्घाटन मिशनच्या प्रचार-प्रसार विभागाचे समन्वयक डॉ.दर्शन सिंह यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी मिशनचे स्थानिक सेक्टर संयोजक मनोहर सावंत, सेवादल क्षेत्रीय संचालक अरुण पाटील, मुखी महेश चव्हाण यांच्यासह अनेक शाखांचे प्रबंधकगण उपस्थित होते. या दोन्ही शिबिरांचे यशस्वी आयोजन करण्यामध्ये स्थानिक मुखींच्या देखरेखीखाली स्थानिक सेवादल युनिट व एसएनसीएफच्या स्वयंसेवकांनी महत्वपूर्ण योगदान दिले.

# 'चिंकोरा' या आगरी बोलीतील कविता संग्रहाचे प्रकाशन



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी) :** कवी जयंत पाटील लिखित 'चिंकोरा' या आगरी बोलीतील ई-बूक काव्यसंग्रहाचे प्रकाशन कल्याण येथे सुरू असलेल्या अखंड वाचन यज्ञात पुनर्प्रकाशन करण्यात आले. सदर प्रकाशन हे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, सदस्य. रायगडभूषण प्रा. एल.बी.पाटील, साहित्यिक कैलास पिंगळे अलिबाग आणि अनंत शिसवे यांच्या हस्ते करण्यात आले.'चिंकोरा' या काव्य संग्रहास ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य डॉ. सदानंद पाटील यांनी प्रस्तावना दिली आहे. मुखपृष्ठ नंदेश गावंड यांनी बनविले आहे. तसेच साहित्यिक अरविंद म्हात्रे, चंद्रकांत पाटील, कैलास पिंगळे, एल. बी. पाटील, संदेश भोईर, नवनाथ ठाकुर यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. या काव्यसंग्रहातुन आगरी बोली, संस्कृती, परंपरा, सण, उत्सव, ग्रामिण जीवन, भूमीपुत्रांच्या समस्या, व्यवसाय, समाजकारण आणि राजकारण, शहरीकरण, शिक्षणातील दशा आणि दिशा, अशा विविध विषयांद्वारे समाज मनाला 'चिंकोरा', म्हणजे शाब्दिक चिमटा काढुन जागरुकता व समाज प्रबोधन करण्याचा प्रयत्न कल्याण सापाड गांव येथे राहणारे प्रसिद्ध आगरी कवी जयंत पाटील यांनी केला आहे. वाचकांना ई.बूक स्वरुपात हे ऑनलाईन उपलब्ध राहील.

# एन. टी. केळकर स्मृती चषक उपांत्य फेरीत के.सी.गांधी शाळेचा विजय



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :** १६ वर्षा खालील शालेय एन. टी. केळकर स्मृती चषकाच्या उपांत्य फेरीत दादोजी कोंडदेव स्टेडियम येथे खेळले गेलेला सामन्यात श्रीमती के.सी.गांधी या शाळेने श्री मां विद्यालयावर दणदणीत व सहज विजय मिळविला.नाणे फेक जिंकून श्रीमती के.सी.गांधी शाळेने श्री मां विद्यालयाला प्रथम फलंदाजीचे आव्हांन दिले होते. तो निर्णय सार्थक ठरला. ३४ शतकात श्री मां विद्यालयाचा ११७ धावात खेळ संपुष्टात आला. कल्पेश मिश्रा ९ शतकात ३९ धावा देऊन ३ गडी बाद, अर्णव निकाळजे ९ शतकात २५ धावा देऊन ३ गडी बाद, श्री मां विद्यालयाचा कामेश जाधव ३९ धावांचा वाटा होता. ११७ धावांचा पाठलाग करताना ३० शतकात ४ गडी गमावून दणदणीत विजय मिळवला. आयुष सायलूचा ५० धावांचा प्रमुख वाटा होता.पारितोषीक वितरण समारंभाला प्रमुख पाहुणे एम. पी.एल.चे अध्यक्ष विहंग सरनाईक, तिसऱ्यांदा निवडून आलेले आमदार संजय केळकर व त्यांच्या मातोश्री समारंभाला उपस्थित होते. श्रीमती के.सी.गांधीचे प्रशिक्षक इंद्रजित वर्मा यांनी हे यश कसे मिळाले याबाबत सांगताना शाळेचे व्यवस्थापक कै. अशोक प्रधान, मनोहर पालन, हेमंत जोशी, आचार्य गोविंद राजपूत, रानडे, जयवंत पाटील यांचा पाठींबा व खेळाडूंचा सतत सराव यांचा प्रमुख वाटा या यशात असल्याचे सांगितले.

# लायन्स क्लब इंटरनॅशनलचा विभागीय सामाजिक कार्यक्रम संपन्न

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी) :** लायन्स क्लब इंटरनॅशनलचा विभागीय सामाजिक कार्यक्रम हॉटेल लँडमार्क हिरानंदानी खारघर येथे संपन्न झाला. झोनल चेअरमन आर. एन. यादव यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. दरवर्षी झोनल चेअरमन यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. एका झोनल चेअरमनच्या मार्गदर्शनाखाली ५ ते ६ क्लब आपले उपक्रम करतात. प्रत्येक क्लबचे अध्यक्ष झोनल चेअरमन सोबत समन्वय करून आपआपला क्लब चालवतात. या कार्यक्रमात मुख्य अथीती म्हणून मधुसुधन टीआर हे होते. तर प्रथम उपजिल्हा प्रांतपाल संजीव सूर्यवंशी, द्वितीय उपजिल्हा प्रांतपाल प्रविण सरनाईक पाहुणे म्हणून उपस्थित होते. एएसएन मुर्ती, अविनाश गोएल, धर्मपाल चुघ यांनी कार्यक्रमाचे मार्गदर्शन केले.



तुकाराम घोडके यांनी कार्यक्रमाची रूपरेखा तयार केली. निर्मला अरोरा यांनी संचलन केले. क्लबचे अध्यक्ष वैभव शुक्ला, भावना गुप्ता मनीषा जाधव, आर. पी. पांडे हे देखील उपस्थित होते.

माजी प्रांतपाल मुकेश तनेजा, संजीव सूर्यवंशी, प्रविण सरनाईक, कॅबिनेट सचिव सत्यपाल चुघ या सर्वांनी या विभागीय सामाजिक उपक्रमाचे सुनियोजितपणे आयोजन केल्या बद्दल आर. एन. यादव यांचे कौतुक केले.

# खानदेश कन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी स्मृतिदिन संपन्न



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता डोंबिवली(प्रतिनिधी) :** खानदेशी बोलीभाषेत जीवनाचे तत्त्वज्ञान सोप्या शब्दांत मांडणाऱ्या खानदेश कन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या ७३ व्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन सोहळा आज मंगळवारी सकाळी ८:०० वाजता कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या डोंबिवली पूर्व विभागातील सुनील नगर येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उद्यानात मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे आयोजन बहिणाबाई चौधरी उद्यान व्यायाम समितीच्या वतीने करण्यात आले. उद्यानात दररोज व्यायामासाठी येणाऱ्या महिला आणि पुरुषांच्या सहभागातून या कार्यक्रमाला विशेष रंगत आली. या कार्यक्रमात प्रमुख आकर्षण ठरले बहिणाबाई चौधरी उद्यानात डिजिटल पेंटिंग वर्क करणारे माननीय श्री सुनील चौधरी यांची उपस्थिती.

या कार्यक्रमात समिती सदस्य, माजी नगरसेवक श्री प्रकाश माने आणि श्री विनय दीक्षित यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या जीवनकार्याचा स्मरण आणि त्यांच्या विचारांचा प्रसार याबद्दल मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी समितीच्या सदस्यांनी विशेष लक्ष दिले.

# केडीएमसी आयुक्तांनी केली कल्याण महापालिकेच्या मराठी शाळांची पाहणी

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :** कल्याण डोंबिवली महा पालिका आयुक्त इंदु राणी जाखड यांनी सोमवारी महानगर पालिकेच्या मनपा शाळा क्रमांक ३३ धाकटे शहाड, शाळा क्रमांक ६३ मिलिंद नगर, शाळा क्रमांक ६८ बारावे या तीन शाळांना भेटी दिल्या. या भेटी दरम्यान शाळा इमारत, वर्ग खोल्या, दिल्या जाणाऱ्या भौतिक सुविधा तसेच शाळा परिसर यांची त्यांनी पाहणी केली आणि शिक्षक व विद्यार्थी



यांच्याशी वर्ग सुरू असताना संवाद साधला. शाळेसंदर्भातील बाबी म्हणजे विद्यार्थी पटसंख्या वाढविणे, शैक्षणिक सुविधा पुरविणे, शाळा इमारत सुसज्ज करणे याबाबत संबंधित अधिकारी व अभियंता यांना त्यांनी सूचना दिल्या. त्याचप्रमाणे विनापरवानगी रजेवर जाणाऱ्या शिक्षकांची विनावेतन रजा मंजूर करण्याबाबत व वेळेत शाळेत हजर न राहणाऱ्या शिक्षकांवर कडक कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. तसेच वेळप्रसंगी निलंबित करण्याची कारवाई करण्याच्या सूचनाही आयुक्त इंदु राणी जाखड यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी शिक्षण विभागाचे उपायुक्त प्रसाद बोरकर, प्रशासन अधिकारी रमेश चव्हाण, शिक्षणाधिकारी विजय सरकटे तसेच इतर अधिकारी वर्ग उपस्थित होता.

# सी. एन. पाटील फाऊंडेशनची आदिवासी पाडयांवर भाऊबीज

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :** सी .एन. पाटील फाउंडेशन कल्याण यांच्यावतीने मुरबाड येथील कोलठण या गावात ठाकरे नगर येथे गोरगरीब आदिवासी लहान मुले व महिला यांना दिवाळी भाऊबीज निमित्य जीवनावश्यक साहित्य अर्थात साड्या, ब्लाऊज पीस, शर्ट पॅन्ट पीस, रुमाल व सर्वांना मिठाईवाटप रविवारी करण्यात आली. यावेळी सी. एन. पाटील फाउंडेशनचे अध्यक्ष चंद्रशेखर पाटील व संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. बापू शिंपी, संस्थेचे



मान्यवर सभासद प्रल्हाद तळेले, अॅड. रवी प्रधान, पी. के. अहिरे, किशोर चौधरी, अमोल चौधरी, सत्यप्रकाश गुप्ता, अर्चना चौधरी, प्रियवंदा पाटील, अंजना रेड्डी, मनीषा राव, विजया शिंदे, स्नेहल पवार, कांबळे, अनिता चौधरी, पुरुषोत्तम जोशी आदीजण उपस्थित होते.हा कार्यक्रम निलेश भोईर तसेच कोलठण गावचे पोलीस पाटील दीपक ठाकरे यांच्या पुढाकाराने उपक्रम राबविण्यात आला. त्यांच्यासोबत सरपंच सुदाम देसले, कैलास ठाकरे, राहुल ठाकरे, दत्ता रसाळ, अजय ठाकरे, विठ्ठल गोले व गावातील मान्यवर उपस्थित होते. सी. एन. पाटील फाउंडेशनने या आदिवासी पाड्यावर भाऊबीज या कार्यक्रमात ३०० हून जास्त गरीब महिलांना व मुलांना भेटवस्तू देऊन त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद अनुभवला. या स्तुत्य उपक्रमात मुरबाडच्या पंचक्रोशीत सर्वत्र कौतुक केले जात आहे. असेच उपक्रम संस्थेने दरवर्षी राबवावेत अशी मागणी पोलीस पाटील दीपक ठाकरे व इतर सर्व गावकरी यांची होती. संस्थेचे उपाध्यक्ष बापू शिंपी यांनी सर्वांचे आभार मानले.

## भाजपा ठाणे(ग्रामीण)जिल्हा सदस्य नोंदणी अभियान बैठक संपन्न





**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/भिवंडी(प्रतिनिधी) :** भारतीय जनता पार्टी,(भाजपा), तालुका प्रभारी अध्यक्षपदी मा. श्री. तुकाराम भाकरे यांची जिल्हाध्यक्ष जितेंद्र डाके यांनी केली नियुक्ती दि. २/१२/२४ डिसेंबर रोजी ठाणे जिल्हा ग्रामीण जिल्हा सदस्यता नोंदणी अभियानाबाबत भिवंडी येथील जिल्हा कार्यालया बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीसाठी माजी आमदार सदस्यता नोंदणी सहप्रमुख महाराष्ट्र प्रदेश नरेंद्र पवार उपस्थित होते.जिल्हा सरचिटणीस संभाजी शिंदे, प्रदेश सदस्य रामनाथ पाटील उपस्थित होते. प्रत्येक विधानसभेत ५० हजार नवीन सदस्य नोंदल्याचा संकल्प करण्यात आला.व तसे करण्याबाबत कार्यकर्त्यांना प्रोत्साहित करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे प्रस्तावित माननीय जिल्हाध्यक्ष जितेंद्र ढाके यांनी केले. तसेच माजी आमदार व प्रदेश सदस्य नोंदणी सहप्रमुख नरेंद्र पवार यांनी कार्यकर्त्यांना संबोधित केले. प्रदेश सदस्य रामनाथ पाटील यांनी आभार व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने शहापूर तालुक्यातील सर्व भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते. सदस्यता नोंदणीला चालना मिळावी गती मिळावी, योग्यतेने लक्ष देण्यात यावे त्यासाठी जिल्हा अध्यक्ष जितेंद्र डाके यांनी साधे सरळ स्वभावाचे तसेच सर्वांना सामावून घेणारे गुणवान,कर्तुत्ववान, व्यक्तिमत्व मा.श्री. तुकाराम भाकरे यांची या योग्य पदासाठी निवड केली. त्यांच्या या नावाच्या घोषणेने भारतीय जनता पक्षामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच शहापूर तालुका सदस्यता नोंदणी संयोजक मा.श्री मुकुंद शिर्के यांची नियुक्ती करण्यात आली,सहसंयोजक गजानन गोरे, कैलास धामणे, योगेश ठाकरे, महिला सहसंयोजक, राजेश्री घाटाळ, सोशल मीडिया प्रमुख मनोज दिनकर, आयटी प्रमुख सचिन जाधव यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी मा.श्री.अशोक इरनक, शहापूर विधानसभा निवडणूक प्रमुख, प्रभारी तालुका अध्यक्ष मा.श्री तुकाराम भाकरे, मा.श्री मुकुंद शिर्के, गजानन गोरे, दत्ता डिंगोरे,चेतन जाधव, विनोद कदम, आनंद अधिकारी, विनोद सिंग सागर, कृष्णा अंधाडे, रवींद्र घरत, योगेश ठाकरे विनायक सावंत,कुंदन जाधव, बाळू शिंदे, विठ्ठल भांगरे, विलास जोशी, तुषार हरड, सचिन जाधव, बाळा वाळिंबे, राजेश विशे, अरुण मस्कर, केशव भाकरे, कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी विश्व हिंदू परिषद जिल्हा संयोजक विजय डिंगोरे, योगेश भोईर योगेश किरपण आधी कार्यकर्ते उपस्थित होते.

## ग्लोबल गोल्ड टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्ड तर्फे विविध पुरस्कार जाहीर

GLOBAL GOLD TALENT BOOK OF RECORD

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ नवी मुंबई(प्रतिनिधी) :** नवी मुंबई येथील ग्लोबल गोल्ड टॅलेन्ट बुक ऑफ रेकॉर्ड तर्फे महात्मा जोतीराव फुले यांच्या पुण्यतिथी निमित राष्ट्रस्तरीय महात्मा जोतीराव फुले आदर्श शिक्षक पुरस्कार, समाजभुषण पुरस्कार, व महाराष्ट्र रत्न पुरस्कार जाहीर झालेले असून , पुरस्कार वितरण सोहळा रविवार दि.०८ डिसेंबर २०२४ रोजी आगरी समाज मंगल कार्यालय, कामोठे येथे प्रमुख पाहुण्याच्या हस्ते सपन्न होणार आहे. या पुरस्कार सोहळ्यासाठी महाराष्ट्रातून ८३०अर्ज प्राप्त झाले होते, त्यातून ६० विविध क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे, पुरस्कार स्वरूप सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, आकर्षक मेडल व पुस्तक देवून सन्मानित करण्यात येणार आहे, असे आयोजक संस्थेच्या संचालिका मेघा महाजन यांनी सांगितले.

पुढील पुरस्कार प्राप्त मान्यवरांच्या नावांची घोषणा या वेळी बोलतांना त्यांनी केली. सन्माननीय सर्व विजेत्यांचे मनःपूर्वक आभार आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

## माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ कार्यकारिणी सभा संपन्न

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ झिडके-अंबार्डी(प्रतिनिधी) :** माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य,भिवंडी तालुका कार्यकारिणी सभा नुकतीच तालुक्यातील अंबाडीनाका ' हरे राम,हरे कृष्ण' येथील सभागृहात महासंघाचे सरचिटणीस तथा पत्रकार विजय गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.सदर सभेसाठी महासंघाचे तालुका अध्यक्ष शांताराम पाटील,उपाध्यक्ष नवसु पाटील,कार्याध्यक्ष शामराव भोईर तसेच कार्यकारिणी पदाधिकारी व सदस्य यांची उपस्थिती होती.

माहिती अधिकार या कायद्याची अंमलबजावणी खऱ्या अर्थाने देशात २००५ या वर्षांपासून सुरू झाल्यानंतर नागरिकांना विविध स्वरूपातील माहिती एका अर्जाद्वारे संबंधित सरकारी अथवा खाजगी क्षेत्रातील व्यक्ति,कार्यालय ठराविक दिवसांमध्येच देणे माहिती अधिकार कायद्याने बंधनकारक आहे.परंतु ग्रामीण भागातील नागरिकांना अद्याप ही या कायद्याबाबत अज्ञान असल्यामुळेच अनेक बाबतीत अप्रत्यक्षरित्या अन्याय होत असतात,फसवणूकी होत असतात.विशेषतःग्रामीण भागातील



नागरिकांमध्ये माहिती अधिकार या कायद्याबाबत जनजागृती व्हावी आणि नागरिकांचे हितसंबंध जोपासण्यासाठी ' माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य' स्तरावर हे संघटन प्रभावीपणे काम करीत आहे.या चळवळीला मोठ्या प्रमाणात बळकटी देण्याची काळाची गरज आहे,असे स्पष्ट मत पत्रकार तथा महासंघाचे सरचिटणीस विजय गायकवाड यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात व्यक्त केले आहे.यावेळेस उपस्थित सदस्यांकडून अनेक महत्त्वपूर्ण सुचना महासंघाच्या कार्याच्या दृष्टीकोनातून मांडून भविष्यात आपापल्या परीने महासंघासाठी योगदान देण्याची भूमिका व्यक्त केली,की जेणेकरून भिवंडी तालुक्यातील महासंघाचे कामकाज इतरांना मार्गदर्शक ठरावे.

अशाप्रकारे माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ भिवंडी तालुका कार्यकारिणी सभा अंत्यत सुनियोजनबद्ध पार पडली.

## सीखें संस्थेची भाषा आणि गणित विषयाची कार्यशाळा संपन्न







**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ बदलापूर(प्रतिनिधी) :** जिल्हा परिषद शिक्षण विभाग ठाणे,जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था,राहटोली आणि सीखें यांच्या संयुक्त विद्यमाने चालू असलेल्या टीचर इनोवेटर प्रोग्राम (TIP) अंतर्गत तालुक्यातील कुळगांव-बदलापूर नगरपरिषद,अंबरनाथ नगरपरिषद शाळांमधील गणित आणि भाषा विषयाच्या शिक्षकांचे दिनांक २/१२/२०२४ ते ३/१२/२०२४ दोन दिवशी ऑफलाइन प्रशिक्षणाचे आयोजन श्रीजी हॉल, बदलापूर पूर्व,कात्रप या ठिकाणी आनंदमय वातावरणात संपन्न झाला.

या दोन दिवसीय कार्यशाळेत अंबरनाथ तालुक्यातील १०० शिक्षकांनी उत्सपूर्ध सहभाग घेतला.गणित विषयात अपूर्णांक या घटकावर नवीन क्लुप्त्या, दृश्यरूप सादरीकरण, मॉडेल प्रदर्शन, कृतियुक्त अध्यापन आशा विविध अंगांना स्पर्श करून गणित विषयाचे सीखें संस्थेचे प्रोग्राम लीड वर्षा परचुरे मॅडम,विषय तज्ञ समीर वारंकर सर,यांनी अपूर्णांकातील बेरीज, वजाबाकी,भागाकार, गुणाकार या संकल्पना नवीन पद्धतीने शिक्षकांन पर्यंत पोहचवल्या तर भाषा विषयामध्ये गोष्टीची पुस्तके हाताळने, गोष्टीच्या पुस्तकांचे महत्व, गोष्टीच्या घटकांची ओळख, विद्यार्थ्याला लेखक कसं बनवता येईल ? यासाठी गोष्टींच्या विविध घटक यावर कृतियुक्त चर्चा सत्र भाषा विषयाच्या सीखे संस्थेच्या विषय तज्ञ स्मिता ढगे मॅडम, अश्विनी शहा यांनी मार्गदर्शन करून ते विद्यार्थ्यांन परेंत कसे पोहचेल यासाठी शिक्षकांकडून गोष्टी तयार करून घेतल्या.या प्रशिक्षणासाठी बदलापूर नगरपरिषदेचे केंद्रप्रमुख जामनिक सर, केंद्रसमन्वयक सोळसे सर,हे या कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरवातीला जामनिक सर,सोळसे सर, वाळके सर यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले. प्रशिक्षणाचे महत्व काय? शिक्षकां पुढील आव्हाने, जबाबदाऱ्या या सगळ्या विषयावर त्यांनी हात घातला.सीखेँच्या कार्यपुस्तिका, पद्धतीचे शिक्षक विद्यार्थी यांच्या दृष्टीने अध्ययन -अध्यापनातील महत्व काय आहे, त्याची उपयुक्ता काय आहे.याचे विश्लेषण करून त्यांनी सीखेंच्या सीखे संस्थेच्या कार्याला खूप खूप शुभेच्छा दिल्या.

प्रशिक्षणा वेळी सीखे संस्थेच्या नॅशनल लीड वर्षा परचुरे मॅडम या कार्यशाळेला उपस्थित होत्या. प्रशिक्षण व्यवस्थित पारपदण्यासाठी ठाणे सिखें टीमच्या जिल्हा समन्वयक अश्विनी पाटील,मनोहर कामनकर,उत्कर्षा पाटील, नरेश सोनवणे,योगिता रहाटे, सुशील भोजणे यांनी विशेष मेहनत घेतली.

## 'अखंड वाचन यज्ञ महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचला पाहिजे' - पुंडलिक पै

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :** 'वाचन वाढीस लागावे यासाठी अक्षरमंच सामाजिक सांस्कृतिक प्रतिष्ठानसारखी एखादी संस्था किंवा दोन-चार जणांनी प्रयत्न करून चालणार नाही तर त्यासाठी अनेक संस्थांची आणि अनेक हातांची आवश्यकता आहे अखंड वाचनयज्ञ यासारखे वेगळेपण जपणारे उपक्रम केवळ कल्याण डोंबिवली परिसरात सीमित राहून चालणार नाही तर अखंड वाचन यज्ञ हा वाचन उपक्रम महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचला पाहिजे . यासाठी समाजातील सर्व स्तरातील लोकांनी एकत्र येऊन प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे असे प्रतिपादन पै फ्रेंड्स लायब्ररीचे संस्थापक व वाचन संस्कृतीचे प्रसारक पुंडलिक पै यांनी केले. कल्याण येथील बालक मंदिर संस्थेच्या प्रांगणात रंगलेल्या अक्षरमंच सामाजिक सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या वतीने व रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याण , इनर व्हील क्लब ऑफ कल्याण यांच्या सहकार्याने आयोजित ५० तासांच्या





अखंड वाचन यज्ञ समारोप प्रसंगी ते बोलत होते.कार्यक्रमाचे दुसरे प्रमुख पाहुणे वाहतूक शाखेतील निवृत्त एसीपी मंदार धर्माधिकारी यांनी आपल्या भाषणात संकल्पनाकार डॉ योगेश जोशी यांचे कौतुक करून सांगितले की , ' निस्वार्थ मनाने हेमंत नेहते व योगेश जोशी यांचे हे कार्य केवळ विद्यार्थी नाही तर समाज घडवित आहेत. यामुळे भरकटलेली तरुणाई त्यांना योग्य दिशा मिळेल आणि त्यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण होईल. या सारख्या उपक्रमांमुळे समाजात सकारात्मकता निर्माण होईल असा विश्वास वाटतो. त्यामुळे केवळ ५० तास नव्हे तर १०० तास हा उपक्रम राबविला पाहिजे.'

प्रा शैलेश रेगे यांनी 'अक्षरमंच प्रतिष्ठानचा हा उपक्रम युनिक असून हा शाळा शाळात महाविद्यालयात राबविला पाहिजे आणि आजच्या विद्यार्थ्यांना सोशल मीडियाच्या विळख्यातून सोडविले पाहिजे. कारण वाचनामध्ये व्यक्तिमत्व विकासाची शक्ती आहे ' असे प्रतिपादन या प्रसंगी केले. या प्रसंगी अक्षरमंच प्रतिष्ठानचे सचिव हेमंत नेहते , रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याणचे प्रेसिडेंट बिजू उन्नीथन, भालचंद्र घाटे, कैलास सरोदे, अपर्णा वैद्य आणि डॉ भालचंद्र वैद्य यांनी मनोगत व्यक्त केले.

बालक मंदिर संस्था येथील जयवंत दळवी वाचन नगरी मध्ये सलग ५० तास आणि एकत्रित २०० तास पार पडलेल्या या अखंड वाचन यज्ञात वय वर्षे ७ ते ८० अशा विविध वयोगटातील १६७८ वाचकांनी डॉ वीणा देव वाचन कट्टा आणि सुधा करमरकर वाचन कट्टा या व्यासपीठावरून वाचन केले.

एकूण ५४ सत्रांमध्ये आयोजित या उपक्रमात १८ सामाजिक व सांस्कृतिक संस्था आणि बालक मंदिर माध्यमिक , प्राथमिक , कॅ र. मा ओक हायस्कूल , श्री गजानन विद्यालय , ज्ञानदीप विद्यामंदिर मुंब्रा ज्ञानदिप कान्वेट स्कूल मुंबा यांच्यासह २२ शाळांचा सहभाग होता. या उपक्रमात मराठी भाषेप्रमाणे संस्कृत , गुजराती, हिंदी , इंग्लिश , आगरी कोळी , अहिराणी अशा विविध भाषा आणि बोलीतील कथा , कविता , एकांकिका , स्फुट , लेख यांचे वाचन करण्यात आले. नाकोडा विद्यालयातील कर्णबधिर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे सत्र या उपक्रमाचे सगळ्यात वैशिष्ट्यपूर्ण सत्र होते. जवळजवळ पन्नास तास चाललेल्या या उपक्रमातील वाचन आस्वाद घेण्यासाठी विविध सत्रांमध्ये १५००० हून अधिक रसिक आणि विद्यार्थ्यांनी गर्दी केली होती.जयवंत दळवी वाचन नगरीमध्ये वाचन विषयक विविध घोषवाक्ये , कविता आणि पुस्तक पंढरी , ज्ञानाचा वटवृक्ष , पुस्तकांच्या कलाकृती, घे भरारी वाचन सेल्फी पॉइंट, अशा विविध प्रकारे वातावरण निर्मिती करण्यात आली होती. कैलास सरोदे, हेमंत नेहते आणि डॉ योगेश जोशी यांनी केलेल्या आकर्षक सजावटीने सगळ्यांनी कौतुक केले. हायमीडिया लॅबोरेटरीज, खर्डीकर क्लासेस , साप्ताहिक कल्याण नागरिक , जोशी फायनान्शिअल , रेगे दीक्षित सायन्स अकादमी यांच्या सहकार्याने पार पडलेल्या या आगळयावेगळ्या उपक्रमासाठी नमिता भिडे, रमेश मोरे, भालचंद्र घाटे , आरती मुळे , मुग्धा घाटे , मीनाक्षी सरोदे , आरती कुलकर्णी यांचे विशेष सहकार्य लाभले. उदघाटन व समारोप सत्राचे सूत्रसंचालन सुकन्या जोशी , प्रास्ताविक डॉ सुश्रुत वैद्य तर आभार प्रदर्शन डॉ अर्चना सोमाणी यांनी केले.

पान १ वरून...

## शिवसेनेइतक्या जागा...

शिवसेना तीन नंबरवर आहे. अजित पवारांबरोबर आमची एक बैठक झाली. त्या बैठकीत आम्ही हिशोब केला. आता शिवसेना शिंदे पक्षाला जास्त जागा मिळाल्या त्यांनीही जास्त जागा लढवल्या, त्यामुळे त्यांच्या जास्त जागा निवडून आल्या. त्या मानाने आम्हाला जागा मिळाल्या आणि आमचे उमेदवार निवडून आले.

स्ट्राईक रेटनुसार आमच्यात दोन आणि तीन नंबरमध्ये थोडासा फरक आहे. आमचा स्ट्राईक रेट चांगला आहे. मग तुम्ही आम्हाला त्यांच्या बरोबरीने जागा द्या, एवढीच आमची मागणी आहे. यावर आता जे काय आहे ते सर्व नेते बसून निर्णय घेतील. कदाचित आम्हा दोन्ही पक्षांना समान जागा देतील किंवा एखादी जागा कमी जास्त होईल, असे मत छगन भुजबळ यांनी मांडले.

दरम्यान, सरकार स्थापन होण्यासाठी वेळ लागत असला तरी अस्वस्थ होण्याचे काही कारण नाही. काळजीवाहू मुख्यमंत्री असले तरी काही अडचण निर्माण झालेली नाही. राज्य व्यव्यवस्थित सुरु आहे. सर्व अधिकारी त्यांचे काम पाहत आहेत, असे सांगत अजित पवार गटात नव्या चेहऱ्यांना संधी मिळणार का, यावर बोलताना, आता काही जण दोन ते चार वेळा निवडून आलेले आहेत, पण त्यांना मंत्रिपदे मिळालेली नाहीत. मग ते म्हणतात की, आम्ही मंत्री कधी होणार? मग काही नवीन आणि जे दोन ते तीन वेळा निवडून आलेले आहेत त्यांना संधी दिली जाते. हे सर्व पक्षांमध्ये होते, त्यामुळे सर्वच पक्षात जुने आणि नवीन चेहरे दिले जातात, असे छगन भुजबळ यांनी म्हटले आहे.

पान १ वरून...

## लाडक्या बहिण योजनेसाठी...

महायुतीचा जाहीरनामा समितीचा अध्यक्ष या नात्याने जाहीरनाम्यातून दिलेली आश्वासने धुळीस मिळू देणार नाही. सरकारमध्ये प्रत्येक पात्र महिलेला २१०० रुपये देण्याची क्षमता आहे. जानेवारी की जुलै, कोणत्या महिन्यापासून ही वाढीव रक्कम द्यायची यावर चर्चा केली जाईल. गतवर्षी भाऊबीजेच्या दिवशी योजना लागू झाली. त्यामुळे पुढील वर्षी भाऊबीजेपासून ही रक्कम वाढवू शकतो, असेही त्यांनी सांगितले आहे.

**पाच हप्ते मिळाले, पुढचे काय?**

मतदानापूर्वी लाडकी बहीण योजनेचे पाच हप्ते ७ हजार ५०० रुपये खात्यात जमा झाले. जुलै व। ऑगस्ट महिन्यांचा पहिला अन् दुसरा हप्ता पात्र महिलांच्या खात्यात जमा केला होता. त्यानंतर सप्टेंबर महिन्यातील हप्ताही काही दिवसांच्या फरकाने महिलांच्या खात्यात जमा झाला. दरम्यान, आचारसंहिता लागू होण्याअगोदरच ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्यांचे एकत्रित पैसे दिवाळीतच खात्यात जमा केले आहेत.

महायुती सरकार पुन्हा सत्तेत आल्यास या योजनेचे पैसे दीड हजार रुपयां- वरून २ हजार १०० रुपये करणार असल्याचे आश्वासन दिले होते. महायुतीचा दणदणीत विजय झाला.

**या अटींची सुरू झाली चर्चा**

लाभार्थी महिलेचा पती आयकर भरतो का? कुटुंबाकडे चारचाकी वाहन आहे का?, एकाच कुटुंबातील दोनपेक्षा अधिक महिलांनी अर्ज केले आहेत का? विधवा, परित्यक्ता, निराधार व अन्य योजनांचा लाभ घेतला जातो आहे का? असे निकष तपासून लाडक्या बहिणींची यादी तयार होऊ शकते, अशी चर्चा सुरू झाली. प्रकारचे निकष लावले, तर जिल्ह्यात लाभार्थी महिलांची संख्या कमी होऊ शकतो.

## ग्रामपंचायत निवडणुकांचा...

बसण्याची शक्यता आहे.

**सरपंचपदाची थेट निवडणूक**

राज्य पातळीवर मुख्यमंत्रिपद हे जसे सर्वोच्च असते, तसेच गाव-खेड्यांमध्ये सरपंचपद सर्वोच्च असते. छोट्या खेडेगावाचा कारभार ग्रामपंचायतींमार्फत सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवकांच्या मदतीने चालतो. आता थेट जनतेतून सरपंच निवडणे म्हणजे मतदार थेट सरपंचपदासाठी उभ्या असलेल्या उमेदवारांना मतदान करतात. ग्रामपंचायतीत लोकसंख्येनुसार, कमीत कमी सात आणि जास्तीत जास्त १७ सदस्य गरजेचे असतात. या सदस्यांना मतदान करून निवडले जाते. त्यामुळे मतदारांना दोन वेळा मतदान करावे लागेल. एक आपल्या भागातील सदस्य निवडीसाठी आणि दुसरे सरपंच निवडीसाठी.

**विकासाची सूत्रे सरपंचाच्या हाती-** २०१७ पूर्वी म्हणजे भाजप-शिवसेना युतीने सरपंचाची निवड थेट जनतेतून करण्याचा निर्णय घेतला, त्यापूर्वी सरपंच ग्रामपंचायतीच्या विजयी सदस्यांच्या बहुमताने निवडला जायचा. गावाच्या विकासाचे बहुतांश अधिकार सरपंचाच्या हातात असतात. गावात येणारे गृहबांधणी प्रकल्प, नवीन योजना, विविध परवानग्या यांसारख्या कामांना मान्यता सरपंचाविना देता येत नाहीत. त्यामुळे सरपंचाला अनन्यसाधारण महत्त्व आले आहे.

सध्या तहसीलदार स्तरावर निवडणुकीचे हे काम सुरू आहे. या कामाबरोबर मतदार याद्या अद्ययावत केल्या जात आहेत. जानेवारीमध्ये निवडणूक कार्यक्रम जाहीर होऊन फेब्रुवारीपर्यंत हा कार्यक्रम संपेल, असा अंदाज आहे.- रवींद्र शेळके, उपजिल्हाधिकारी, सामान्य प्रशासन

## सरपंच,केंद्रप्रमुख व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत विषय मित्रांचा गौरव सोहळा व विविध बक्षीस वितरण संपन्न

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता अंबरनाथ(प्रतिनिधी) :** जिल्हा परिषद शाळा साई तालुका अंबरनाथ येथे सरपंच ,शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, केंद्रप्रमुख,विषय साधन व्यक्ती, विशेष शिक्षक व ग्रामस्थांच्या उपस्थितीत विषयमित्रांचा गौरव ,अपंग दिन व रंगोत्सव सेलिब्रेशन तर्फे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय स्पर्धेचे बक्षीस वितरण असा तिहेरी समारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्याचे प्रमुख कारण म्हणजे शाळेत राबविला गेलेला विषयमित्र हा उपक्रम. कोण म्हणतं मुले फक्त शिक्षकांकडूनच शिकतात. हा निसर्ग, मित्र, नातेवाईक,शेजारी यांच्याकडूनही मुले अनुभव घेऊन खूप काही शिकत असतात.गरज असणे किंवा आवड असणे या दोनच कारणांमुळे मूल शिकत असते. तणावमुक्त आणि भयमुक्त वातावरणात जर मित्रांनीच मित्राला शिकवले तर मुले आनंदाने व आवडीने शिकतात. प्रत्येक मुलाची शिकण्याची गती कधीही एकसारखी नसते.काही मुलांना एकदा सांगून लगेच समजते तर काही मुलांना तीन ते चार वेळा सांगावे लागते. अशावेळी एकच शिक्षक या मुलांना त्यांच्या गतीनुसार शिकण्याची संधी देऊ शकत नाही. अशावेळी विषय मित्र हे दीपस्तंभा ची भूमिका बजावतात. मुले ही मुलांकडून



चांगल्या गतीने व पद्धतीने शिकू शकतात.

हे दाखवून दिले आहेत जिल्हा परिषदेतील विषय मित्रांनी व सहाध्यायी मित्रांनी. जिल्हा परिषदेच्या साई शाळेत इयत्ता पहिली ते चौथीच्या वर्गात एकूण ४५ विद्यार्थी शिक्षण घेत आहे.

हि एक शिक्षकी शाळा असून पाच वर्षांपूर्वी शाळेचा पट केवळ ५ विद्यार्थी शिकत होती. त्यानंतर शाळेत अनिता पाटील या नवीन शिक्षिका रुजू झाल्या.त्यानंतर शाळा प्रवेशाचा आलेख हा वाढतच गेला.वरिष्ठ कार्यालयाकडे दरवर्षी शिक्षक व ग्रामस्थांकडून शिक्षक मागणी केली जाते. पण अद्यापही शासन स्तरावरून शाळेला शिक्षक प्राप्त झालेला नाही.परंतु तालुक्याचे कुटुंबप्रमुख गटशिक्षणाधिकारी माननीय श्री. राजकुमार जतकर साहेब, व विस्तार अधिकारी श्रीमती भंडारी मॅडम, केंद्रप्रमुख श्री गणेश जाधव यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनामुळे शाळेत विषय मित्राद्वारे,सहाअध्यायी मित्राद्वारे व गटपद्धतीने विद्यार्थी अध्ययन करतात.

नवीन शैक्षणिक धोरणानुसार शाळेच्या शिक्षिका यांनी अध्ययन प्रक्रियेच्या व्यवस्थापनाचे प्रशिक्षण घेतले त्यात विषय मित्र संकल्पना नीट समजावून घेऊन शाळेत त्याची अंमलबजावणी करण्यात केली जात आहे. शाळेतील हुशार विद्यार्थ्यांच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना पायाभूत शिक्षण द्यायला सुरुवात केली.

विद्यार्थ्यांच्याच मर्जीने त्यांना आपल्या मित्राची निवड करण्याचे स्वातंत्र्य दिले. त्यामुळे मुले शिक्षकांच्या सानिध्यात जेवढे शिकत होते त्याहीपेक्षा अधिक चांगल्या प्रकारे शिकताना पाहून पालकांचा आनंद द्विगुणित झाला.

मधल्या सुट्टीत,शिक्षक इतर कामात असतील किंवा फावल्या वेळेत विषय मित्राच्या सहाय्याने विद्यार्थ्यांचे अध्ययन सुरू असते. याचा फायदा असा झाला की चार महिन्यात एक शिक्षक जे करू शकले नसते ते या विषय मित्रांमुळे शक्य झाले. योग्य अशा नियोजनामुळे व शिक्षकांच्या मार्गदर्शक भूमिकेमुळे विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर वाढण्यात विषय मित्रांचा सिंहाचा वाटा आहे. आणि म्हणूनच त्यांचा भेटवस्तू व पुष्प देऊन गौरव समारंभ शाळेत संपन्न झाला.हा उपक्रम असाच चालू ठेवल्यास सर्व विद्यार्थ्यांच्या ९० ते ९५ टक्के क्षमता विकसित होण्यास मदत होईल असे गावचे सरपंच व उपस्थितांनी आपले मत व्यक्त केले. जागतिक अपंग दिनाचे औचित्य साधून शाळेच्या माजी दिव्यांग विद्यार्थ्यांचा व त्याच्या आईचा गौरव करण्यात आला.तसेच रंगोत्सव सेलिब्रेशन तर्फे घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभ सुद्धा आयोजित करून मुलांचा आनंद द्विगुणित करण्यात आला.

राज्यस्तरावरून प्राप्त झालेले एकूण १२ विद्यार्थ्यांना मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले तसेच सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. मुळगाव केंद्राचे केंद्रप्रमुख श्री.गणेश जाधव सरांनी यावेळी शाळेत विविध उपक्रम राबवत असल्या बाबत व दर्जेदार व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत तालुक्यात प्रथम क्रमांक आल्याबद्दल शाळेतील शिक्षिकेचे शाल व पुष्प देऊन सत्कार केला.

यावेळी साई गावचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य,शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष तथा सदस्य तसेच तालुकास्तरावरील मार्गदर्शक विषय शिक्षक श्री. बोरसे सर व विशेष शिक्षिका श्रीमती शशिकलायंदे मॅडम, पालक वर्ग व ग्रामस्थ उपस्थित होते.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)

मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१

संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com

RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी